<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.२६१/२०१३ – निशाणी ११२ लगत आदेश</u>

सुप्रिया प्रकाश मिसाळ वि. रामचंद्र नामदेव मिसाळ इ.

CNR NO. MHSO2000-1035-2013

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे दाव्यास कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी केलेला आहे. सदर प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी यांना वाद मिळकतीसंबंधीचे आवश्यक असणारी जुनी कागदपत्रे मुदतीत मिळाली नाहीत. त्यामुळे मे.कोर्टात हजर राहुन वादीचे दुरुस्त दाव्यास कैफियत मुदतीत देणे अशक्य झाले आहे. त्यामुळे सदर प्रतिवादी यांचे विरुध्द विना कैफियतचा आदेश झालेला आहे. सदरचा दावा स्थावर मिळकतीचे वादासंबंधी असलेमुळे या दाव्याचा गुणानुरूप न्याय निर्णय होणेचे दृष्टीने प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द झालेला विना कैफियतचा हुकूम रद्द करुन प्रतिवादी यांनी सोबत दिलेली कैफियत स्वीकारणे न्यायाचे हिताचे दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. अन्यथा प्रतिवादी क्र.१ चे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. न्यायाच्या दृष्टीने झालेला विलंब माफ होणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे मांडले की, प्रतिवादीचा सदरचा अर्ज खरा नाही. उशीराचे कारण खोटे व लबाडीचे आहे. प्रतिवादींनी मुद्दाम जाणुन बुजून दाव्याचे काम लांबणीवर पडावे म्हणून व वादीस त्रास व्हावा या हेतुने अर्ज दिलेला असून सदर अर्जात किती दिवसाचा उशीर झाला याचा कोठेही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करणेची विनंती केली. यदाकदाचित अर्ज मंजूर करणेचे झालेस प्रतिवादी कडून वादीस खर्चाची रक्कम देणेबाबत हुकूम करणेची विनंती केली.

३. वादी, प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने सदरचा दावा प्रतिवादीचे विरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी क्र.१ व २ यांना दाव्याचे समन्स दि.१९/१०/२०१३ रोजी मिळाले आहे. परंतु त्यानंतर प्रतिवादी यांनी दाव्याचे कामी मुदतीत कैफियत दिलेली नाही. वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर प्रतिवादी क्र.१ व २ यांनी

मुदतीमध्ये कैफियत दिलेले नाही ही बाब स्पष्ट आहे. परंतु सदरचा अर्ज मंजुर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादीचे नुकसान होणार नाही. परंतु विलंबाचा कालावधी लक्षात घेता खर्च सदर प्रतिवादी क्र.१ व २ यांचेवर ठेवणे योग्य आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

## आ दे श

१. प्रतिवादी क्र.१ व २ यांचा अर्ज (नि.क्र.११२) प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादी यांना रक्कम रु.१,०००/– देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.१ व २ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो व कैफियत दाखल करण्यास परवानगी देणेत येते.

दिनांक – १६/०७/२०२४

( सौ. बी. एम. पोतदार )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला.